# जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त धुळे यांचे कार्यालय

## जाहिर लिलाव

निरूपयोगी द्रवनत्रपात्रे खरेदी करणाऱ्या संस्था/कंपन्या/व्यापारी यांना सुचना देण्यात येते कि,जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र,धुळे येथून निरूपयोगी निर्लेखन केलेले द्रवनत्रपात्रे खालील प्रमाणे द्रवनत्रपात्रे विक्री करावयाची आहेत.सदर पात्रे ईच्छुकांना अवलोकनासाठी ज्या स्थितीत आहेत त्याच स्थितीत कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत.

| अक्र | कालावधी | टीए-५५ | आय एन-५० | आय.आर-३ | बीए-३ | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९८५-८६ ते १९९२-९३ | ०० | ०० | ०० | १० | १० |
| २ | १९९५-९६ ते १९९९-२००० | ०३ | ०० | ०५ | ०२ | १० |
| ३ | २००१-०२ ते २००७-०८ | १८ | ०० | ०० | २३ | ४१ |
| ४ | २००९-१० | ०० | २२ | १४ | ०० | ३६ |
| | **एकुण कंटेनर** | **२१** | **२२** | **१९** | **३५** | **९७** |

त्या करिता दि.०९/०३/२०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र,धुळे येथे जाहिर लिलाव करण्यात येत आहे. ज्या संस्था/कंपन्या/व्यापारी यांना निरुपयोगी द्रवनत्र पात्रे खरेदी करावयाची असतील अशा संस्थानीच भाग घ्यावा. भाग घेण्यासाठी जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,धुळे यांचा नावाने रु. ५०००/-(अक्षरी पाच हजार रुपये मात्र) चा राष्ट्रीयकृत बँकेत काढलेला डी.डी. किंवा रोख रक्कम स्वीकारली जाईल. जाहिर लिलाव समितीचा निर्णय हा अंतीम राहील. विक्री करण्यात आजेल्या द्रवनत्र पात्रांचे हस्तांतर करण्यापूर्वी चेपून टाकण्यात येतील, जेणे करुन त्यांचा पुनर्वापर करणे शक्य होणार नाही.

१. धुळे जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र,धुळे विभागाकडील द्रवनत्रपात्राची लिलावाव्दारे विक्री करावयाची असून विक्री करावयाचा साहित्याचा सविस्तर तपशिल वरीलप्रमाणे आहे.

२. लिलाव करतांना परिस्थितीनुसार निर्धारित वेळेत बदल करण्यात येईल.

३. लिलावाची बोली बोलण्यापुर्वी जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,धुळे यांच्या नावाने रक्कम रु. ५०००/-(अक्षरी पाच हजार रुपये मात्र) चा राष्ट्रीयकृत बँकेत काढलेला डी.डी. किंवा रोख रक्कम किमान रु.५०००/- अनामत म्हणून प्रथम दि.०८/०३/२०२१ पर्यंत जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय, पांजरापोळ समोर, पारोळा रोड, धुळे येथे जमा करावी लागेल. त्याशिवाय बोली बोलता येणार नाही.

४. लिलाव, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र,धुळे येथे कार्यालयीन वेळेत दुपारी १२.०० वाजताचे दरम्यान करण्यात येईल. परंतू कोणत्याही परिस्थितीत व्यत्यय आल्यास किंवा स्थितीत जैसे ते ठेवण्याचे अधिकार राखून ठेवण्यात येत आहे.

५. ज्या किंमतीस लिलाव अंतीम झाला, त्यावेळेस अंतीमबोली धारकाने एकूण किंमतीच्या १० टक्के रक्कम कार्यालयास त्यावेळेस जमा करावी लागेल.

६. लिलावात बोली घेणे तसेच द्रवनत्रपात्राची निर्धारित किंमत प्राप्त झाल्यावरही मंजुरात देणे किंवा न देणे या बाबतचे शासन निर्णयानुसार अधिकारांचा वापर परिस्थितीनुसार करण्यात येईल.

७. लिलाव धारकाने मोक्यावर उपलब्ध द्रवनत्रपात्राची पाहणी करुनच लिलावात बोली बोलावी.

८. अनामत रक्कम भरतेवेळी प्रतिनिधी पाठवल्यास लिलाव धारकाने पॉवर ऑफ अर्टनी आणि स्वतः असल्यास वास्तव्याबाबत पुरावा म्हणून आधारकार्ड/रेशन कार्ड/घर टॅक्स पावती/आयकर पॅन/विक्री प्रमाणपत्र/विदयुत बिल/टेलीफोन बिल/निवडणूक ओळखपत्र यापैकी एक दस्तावेज सादर करणे आवश्यक आहे.तसेच खरेदी दारांनी त्यांचा टॅन नंबर व पॅन नंबरची प्रत सादर करावी.

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,
धुळे